# प्रकरण 4

## हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची वाढ/विकास, सद्यःस्थिती आणि भविष्यकालीन योजना


4·1 कारखान्याची स्थापना

4·2 कारखान्याची वैशिष्टये व पैलू

4·3 कारखाना स्थापन करण्यामागचा हेतू व उद्देश

4·4 दैनंदिन ऊस गाळप क्षमता

4·5 कारखान्याचे ठिकाण व जवळचे साखर कारखाने

4·6 कारखान्याचे कार्यक्षेत्र

4·7 भागभांडवल

4·8 कारखान्याची आर्थिक परिस्थिती

4·9 कारखान्याची प्रगती दाखविणारे विविध तक्ते व आलेख

4·10 कारखान्यातील साखर उतारा

4·11 ऊस संशोधन व विकास योजना

4·12 पाणीपुरवठा योजना

4·13 कारखान्याकडून केली जाणारी इतर कामे

4·14 भविष्यकालीन योजना

## प्रकरण 4

## हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची वाढ/विकास, सद्यःस्थिती आणि भविष्यकालीन योजना

**प्रास्ताविक –**

महाराष्ट्रातील एकूण साखर कारखानदारीत हुतात्मा किसन अहिर साखर कारखाना लि, वाळवेचे एक वैशिष्टयपूर्ण स्थान आहे· हा कारखाना अगदी नवीन असताना व त्यासाठी अनेकवेळा चळवळी कराव्या लागल्या असताना महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील सहकारी साखर कारखानदारीत हुतात्मा कारखान्याने नेत्रदीपक कामगिरी केली आहे· चळवळीतून उभ्या राहिलेल्या हुतात्मा कारखान्याच्या शेतकरी कामगारांनी मिळून कारखाना अत्यंत कार्यक्षमतेने चालविला असून कारखान्याचा 5 वर्षातील साखर उतारा देशामध्ये उच्चांक निर्माण करणारा ठरला· याशिवाय सामाजिक बांधीलकीचा भाग म्हणून कोयना धरणग्रस्त, वारणा धरणग्रस्त, दलित, आदिवासी यांच्यासाठी तसेच ग्रामीण साहित्य संमेलन इ· सारखे प्रकल्प हाती घेतले आहेत· भारतामध्ये सर्वात जास्त साखर उतारा मिळविण्याबरोबरच शेतक-यांच्या ऊसाला सर्वात जास्त दर देणारा कारखाना म्हणूनही हा कारखाना ओळखला जातो·

या कारखान्याने महाराष्ट्राच्या सहकारी साखर उद्योगात एक वादळ उभे केले आहे· आठ तासांच्या आत ऊसाचे गळित होऊन ऊसाच्या वजनातील आणि साखर उता-यातील घट रोखणे यासाठी मर्यादित असे कार्यक्षेत्र करणे, कार्यक्षेत्रातील लहान मोठया शेतक-यांना सार्वत्रिकपणे शेअर्स देणे, प्रत्येक गावाच्या निर्णयाने, सर्वात गरीब थरातून सुरुवात करून शेअर्सच्या प्रमाणात नोक-या देणे, कामावरच्या कामगारांना काढून टाकण्याचा अधिकार त्या त्या गावाच्या गावसभेस देणे, गेटमधून बाहेर येताना कामगारांचे खिसे तपासण्याची लांछनास्पद रीत बंद करणे, संस्थापकांचे कारखान्याचे सभासदत्व न स्वीकारता डायरेक्टर किंवा चेअरमन बनण्याचा मार्ग बंद करणे, प्रत्येक निवडणुकीच्या वेळी चेअरमनसह सर्व डायरेक्टर्स बदलणे या सर्व कारभारातून सतत पाच वर्षे भारतात पहिल्या नंबरचा साखर उतारा काढणे, शेतक-यांना सर्वात जास्त दर देणे, ऊसाच्या वजनातून पालापाचोळयाच्या नावाखाली टनाला 10 किलो वजा न करता, बिलातून अनधिकारे एक पैसासुध्दा न कापणे, ऊसतोडणी आणि साखर कामगारांच्या लढयाच्या मागण्या लढा सुरू होतानाच जास्त रकमेने मंजूर करणे, कार्यक्षेत्रातील गावांचा

अनेक मार्गांनी व वेगाने विकास घडविणे इत्यादी व्यवहारातून संपूर्ण साखर उद्योगाला चांगले वागण्याचा धडा या चळवळीने दिला आहे. त्यामुळे इतर कारखान्यांनाही आपला व्यवहार बदलावा लागेल, अन्यथा या उदाहरणाने जागृत झालेल्या त्यांच्या परिसरातील शेतक-यांच्या प्रचंड असंतोषाला तोंड द्यावे लागेल अशी भिती वाटते.

विदर्भ मराठवाडा येथे साखरधंद्याच्या अविकासातून प्रश्न निर्माण झाले आहेत. तेथील बहुतेक कारखाने आजारीच आहेत. तर दक्षिण महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीत विकासातून प्रश्न निर्माण झालेले आहेत. विशेषतः साखरधंद्यातून निर्माण झालेला नफा काही विशिष्ठ विभागात कसा जिरविता येईल या विवंचनेमधून भ्रष्टाचारासारखे प्रश्न निर्माण झाले आहेत. यातूनच सहकाराचा जास्त फायदा घेणारे व समानरीत्या वंचित असणा-यामध्ये सुप्त तणाव निर्माण झाला आहे. पण सहकाराच्या जाळ्यात अडकलेला छोटा शेतकरी मात्र हा तणाव उघडपणे व्यक्त करु शकत नाही. शिवाय सहकारी क्षेत्रातील निवडणुकीतील पॅनल व्होटिंगमुळे नको ती माणसेच पुन्हा पुन्हा निवडून येतात व एकप्रकारची घराणेशाही निर्माण होते.

परंतु या सर्वांपेक्षा वाळवा येथील हुतात्मा कारखांना वेगळा आहे. नफा सामाजिक कारणा-साठी, सामाजिक बांधीलकीसाठी कसा जिरवावा याचे आदर्श उदाहरण म्हणून या कारखान्याचा उल्लेख करता येईल. या कारखान्याचे प्रवर्तक नागनाथअण्णा नायकवडी नफयातला 4 आणे वाटा शेतकरी, शेतमजूर, धरणग्रस्त, दलित आदिवासी, ग्रामीण भटके, स्त्रिया यांच्या चळवळी उभ्या करुन, त्यांना प्रोत्साहन देऊन या शोषणयुक्त अर्थव्यवस्थेत तळागाळातील जनतेमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी खर्च करतात.

"शेतक-यांनी शेतक-यांसाठी शेतक-यांचेकरवी चालविलेला एकमेव भारतातील आदर्श कारखाना म्हणजे हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना" असे या कारखान्याचे वर्णन करता येईल.

## 4.1 कारखान्याची स्थापना -

हा कारखाना म्हणजे "हुतात्मा किसन अहिर" यांच्या स्मरणार्थ उभे राहिलेले एक औद्योगिक स्मारक आहे. या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात 15 गावे येतात. या गावांचा औद्योगिक, सामाजिक

व सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने या कारखान्याची उभारणी केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शिफारशीनुसार या कारखान्यास केंद्र शासनाकडून दि. 26 मार्च 1981 रोजी इरादा पत्र ( Letter of intent ) मिळाले व त्यानंतर दि. 29-6-81 रोजी मा. साखर संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे सहकारी कायद्यानुसार कारखान्याची नोंदणी झाली. कारखान्याचा बॉयलर प्रदीपन समारंभ बकाव कुल्फ कंपनीचे कार्यकारी संचालक श्री. दमानिया व सौ. दमानिया यांच्या हस्ते दि. 27 नोव्हेंबर 1983 रोजी संपन्न झाला. कारखान्याची उभारणी पूर्ण होऊन सर्व जय्यत तयारीनिशी कारखाना दि. 31-12-83 रोजी गळितासाठी पूर्ण झाला होता. मात्र महाराष्ट्र शासनाने झोनिंगसंबंधी निर्णय घेतला नसलेमुळे कारखान्यास केंद्र सरकारकडून लेटर ऑफ इंटेटचे औद्योगिक परवान्यात रुपांतर होऊन मिळणेस विलंब लागला. भारत सरकारकडून दि. 28-1-84 रोजी औद्योगिक परवाना मिळाला असून त्याचा क्रमांक सी.आय.एल. 26 (84) न्यू दिल्ली दि. 28-1-84 असा आहे. सदरचा परवाना मिळालेनंतर लगेच मा. साखर संचालक यांचेकडून गाळप परवाना ( Crushing licence ) मिळाला आणि दि. 29-1-84 रोजी रीतसर गळितास प्रारंभ झाला.

कारखाना उभारणीचे काम लवकरात लवकर कसे पुरे करता येईल यासाठी मा. संचालक मंडळ व कार्यकर्ते मंडळी यांनी अहोरात्र परिश्रम घेतले आणि कारखान्याची उभारणी सर्वांचे सहकार्याने 31 डिसेंबर 1983 रोजी पूर्ण केली व केवळ 11 महिन्यांच्या कालावधीत कारखाना यंत्रसामुग्री उभारणीचे काम पुरे करण्याचा उच्चांक प्रस्थापित करून दाखविला.

### 4.2 कारखान्याची वैशिष्टये व पैलू -

या कारखान्याची काही ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतात -

1) हा कारखाना 1942 च्या स्वातंत्र्य संग्रामातील एका थोर हुतात्म्याचे औद्योगिक स्मारक म्हणून उभा आहे.

2) कारखान्याची उभारणी अत्यंत जलद गतीने व अल्पावधीत झालेली आहे.

3) क्रांतिवीर नागनाथ नायकवडी यांच्या प्रेरणेने, कष्टामुळे व त्यागामुळे वाळवे परिसरातील

शेतकरी हा कारखाना मिळविण्यात व उत्तमरित्या चालविण्यामध्ये यशस्वी झाले आहेत.

4) ट्रायल सिझनसह एकूण 8 गळित हंगामामध्ये या कारखान्याने साखर उता-यामध्ये (रिकव्हरीमध्ये) भारतात 5 वेळा प्रथम क्रमांक मिळविला आहे. सन 1990-91 हंगामात या कारखान्याचा साखर उतारा 12.60 टक्के इतका पडला आहे.

5) जास्तीत जास्त व उच्चतमदर्जाची साखर मिळविणेसाठी ताज्या ऊसाचा पुरवठा व हे कमीत कमी वेळात व्हावे म्हणून रात्रपाळीने ऊसतोड करणेचा उपक्रम महाराष्ट्रात प्रथमच गेल्या चार हंगामापासून या कारखान्याकडून यशस्वीरीत्या राबविला जात आहे.

6) ऊस उत्पादक शेतक-यांना जास्तीत जास्त ऊसदर व कामगारांना समाधानकारक वेतन व इतर सुखसोई देण्याचा कारखान्याकडून सतत प्रयत्न केला जातो.

7) कार्यक्षेत्राच्या गांवातील अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणेचा महत्वाकांक्षी उपक्रम कारखान्याने हाती घेतलेला आहे.

8) कार्यक्षेत्रातील सर्वांगीण विकासामध्ये शैक्षणिक विकासासाठी शिक्षण संस्थांना सहाय्य करण्याबरोबरच कार्यक्षेत्राबाहेरील जनतेसाठी, सामाजिक बांधीलकी समजून धरणग्रस्त, पददलित व साखर कामगार यासारख्या विविध जनविभागांना अनेकप्रकारे सहाय्य केले जाते.

या वैशिष्टयाव्यतिरिक्त या कारखान्याचे इतरही काही पैलू पुढीलप्रमाणे सांगता येतात -

1) संस्थापनात पुढाकार घेणारी मंडळी / व्यक्ती अधिकारपदावर नसणे.

2) दर तीन वर्षांनी होणा-या निवडणुकीत जुन्या अध्यक्षासह इतर संचालकांना उभे राहण्याचा अधिकार नसणे, प्रत्येक वेळी नवीन अध्यक्ष व संचालक मंडळ असणे.

3) संचालक मंडळाच्या बैठकीत मताधिकारासह सहभागी होण्याचा अधिकार सर्व सभासदांना असणे त्याचबरोबर साखरविक्रीच्या वेळी सहभागी होण्याचा अधिकार असणे.

4) ऊस उत्पादनाचे व साखर उत्पादनाचे अत्याधुनिक शास्त्र सर्व सभासदांपर्यंत आणून रासायनिक खते इत्यादींवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करणे.

5) कारखान्याला होणारा प्रचंड फायदा उघडपणे सभासदांसमोर मांडून संचालक मंडळाला सभासदांच्या नियंत्रणात ठेवण्याचा मार्ग खुला करणे.

6) सभासद शेतकरी, साखर कामगार व ऊसतोडणी करणारे व वाहतूक मजूर यांना कारखान्याच्या

जादा नफयात समान वाटा देण्याची प्रथा या कारखान्याने अवलंबिली आहे.

7} कारखान्याच्या कारभाराविषयीच्या निर्णयात अधिका-यांपेक्षा कामगारांना प्रमुख स्थान देणे.

8} बिलामधून एक पैसाही न कापता नफ्यातून विकास साधता येतो हे दाखविणे. शेअरच्या प्रमाणात गावांना निधी विभागून देणे, केंद्रित पध्दतीने नफयावर नियंत्रण न ठेवणे.

यातून सध्याच्या सहकारी साखर कारखानदारीच्या स्वरूपाविरूध्द धरणग्रस्त, ऊसतोडणी वाहतूक मजूर, दुष्काळग्रस्त यांच्याशी गरीब - मध्यम शेतक-यांची आघाडी बांधून संघर्ष करण्याचा एक ताकदवान पर्याय पुढे येतो. हा आधार घेऊन वाढणारी या सर्व विभागांची चळवळ महाराष्ट्राच्या आर्थिक - सामाजिक राजकीय चित्रात आमूलाग्र बदल घडवून आणू शकते.

## 4.3 कारखाना स्थापन करण्यामागचा हेतू व उद्देश -

हा कारखाना स्थापन करण्यामागे प्रामुख्याने 3 हेतू व उद्देश होते.

1} कारखान्याच्या कार्यक्षेत्रात 15 गावे येतात. या गावांचा औद्योगिक, सामाजिक व सर्वांगीण विकास घडवून आणणे.

2} शेतीचा विकास घडवून आणणे.

3} शिक्षणसंस्थांच्या आर्थिक अडचणी सोडविणे.

याव्यतिरिक्त या कारखान्याच्या उपविधीमध्ये या कारखान्याचे पुढील हेतू व उद्देश देण्यात आले आहेत -

सभासदांना {शेतकरी व त्यांची कुळे} आधुनिक पध्दतीने मोठया प्रमाणावर शेतीच्या उत्पादनाचा जास्तीत जास्त फायदा मिळवून देण्याच्या हेतूने शेती विषयक सुधारलेल्या पध्दतीचा अवलंब करून आणि सहकारी तत्वावर शेती करण्याची पध्दती अंमलात आणून, सभासदांमध्ये शेतीची शेतकी उद्योगधंद्याची व जोड धंद्याची सहकारी तत्वावर योग्यरितीने वाढ होण्यास सक्रीय उत्तेजन देणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे आणि तो साध्य करून घेण्यासाठी संस्था खालील गोष्टी करेल -

1} सभासदांना स्वावलंबन, काटकसर व सहकार्य वाढविण्यास उत्तेजन देणे.

2) कारखान्यास गळितासाठी लागणा-या ऊसाच्या पुरवठयास विलंब लागू नये व ऊसातील साखरेची संभाव्य घट टाळण्यासाठी सभासदांच्या ऊसाची तोडणी करणे व शेतीपासून कारखान्यापर्यंत गळितासाठी वाहतूक करणेसंबंधीच्या व्यवस्थेचा कार्यक्रम तयार करणे.

3) ऊस वा इतर पिकासाठी, तसेच इमारती बांधणे, मशिनरी उभारणे यासाठी खरेदी करून ठरावीक मुदतीसाठी भाड्याने घेऊन किंवा अन्यरित्या जमिन मिळविणे व उपलब्ध करून देणे.

4) सभासदांमध्ये व कार्यक्षेत्रातील शेतक-यांमध्ये शेती व ऊस उत्पादनाच्या आधुनिक पध्दतीचा प्रसार करणे, ऊस वा अन्य पिके घेण्यासाठी बियाणे, खते व शेती अवजारे तयार करणे अगर सभासदांना त्यांचा पुरवठा करणे, शेती उद्योगाचे प्रशिक्षणाला उत्तेजन देऊन सभासदांचा सर्वांगिण विकास व कल्याण साधण्यास पोषक बाबी हाती घेणे.

5) सभासद व इतरांकडून पुरविलेल्या ऊसापासून साखर व गुळ त्यांची पुरक उत्पादने निर्माण करणे व चांगल्या मोबदल्यात त्यांची विक्री करणे.

6) मोठया प्रमाणावर साखर तयार करण्यासाठी कारखाना उभारणे व तो कार्यक्षमतेने चालविण्यासाठी योग्य त्या सर्व बाबी हाती घेणे.

7) चिपाड, मळी, प्रेसमड इत्यादी पूरक उत्पादनावर (बाय प्रॉडक्टस्) प्रक्रिया करण्यासाठी जरूर ती मशीनरी उभारणे, त्याकरिता कच्चा माल खरेदी करणे व तयार झालेला पक्का माल विकणे.

8) जेथे ऊसाचे पिक घेणे शक्य नसेल तेथे अन्नधान्य पिके, रोखीची पिके घेण्यास उत्तेजन देणे.

9) संस्थेच्या विकासास व कल्याणास सहाय्यकारी होतील अशा दुय्यम व पूरक उद्योगसंस्था स्थापन करणे व कार्यक्षेत्रातील लोकांच्या कल्याणास व विकासास सहाय्यभूत होतील अशा दुय्यम पुरक संस्था स्थापन करण्यास उत्तेजन देणे.

10) भारत सरकारच्या सबसिडीईज्ड् इंडस्ट्रियल हौसिंग योजनेनुसार सरकारकडून ज्या अटी घातल्या जातील त्यानुसार (परंतू उपविधीचे उल्लंघन न करता) कर्जे व सबसिडीच्या रूपाने पैसा मिळविणे व त्याचा उपयोग ज्यांना फॅक्टरी ॲक्ट 1948 आणि माईन्स ॲक्ट 1952 लागू होतो अशा सहकारी साखर कारखान्याच्या कर्मचा-यांची घरे बांधण्यासाठी करणे व याबाबत सरकारच्या कर्ज व सबसिडी विषयीच्या अटींचे पालन करण्यासाठी कर्मचा-यांशी योग्य ते करार करणे.

11) संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शेतक-यांसाठी पाणीपुरवठा योजना, शेतीसुधारणा योजना व जोडधंद्याच्या योजना इत्यादी शेतीविकासाच्या योजना तयार करणे, त्यात सहभागी होणे अगर राबविणे, मात्र अशा



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

योजना हाती घेण्यापूर्वीच त्यामध्ये आर्थिक गुंतवणूक करण्यापूर्वी मे. साखर संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांची पूर्वपरवानगी घेतली पाहिजे.

12) संस्थेच्या बेनिफिशरी सभासदांना पाणीपुरवठा व इतर योजनांचा फायदा मिळण्याचे दृष्टीने जमीन सुधारणा, मशिनरी खरेदी व वरील योजनासाठी करावयाची बांधकामे यासाठी या प्रकल्पातील मालमत्तेच्या तारणावर किंवा ज्याना योजनेचा फायदा मिळणार आहे त्यांच्या जमिनी, पिके व स्थावर मालमत्ता यांचे तारणावर पैसा उभारणे यासाठी मे. साखर संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांची पूर्वपरवानगी घेतली पाहिले.

13) शेतावरून ऊस कारखान्यावर आणण्यास कमीत कमी खर्च व कमीत कमी वेळ लागावा म्हणून संस्थेच्या कार्यक्षेत्रात नवीन रस्ते बांधणीचा कार्यक्रम हाती घेणे, अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची निगा राखणे, रस्त्यांची तसेच कारखान्याच्या विकासास पूरक ठरतील अशी पाणीपुरवठयाची कामे कंत्राटाने देणे घेणे व यासाठी स्थानिक लोक, जिल्हा परिषदा, स्थानिक संस्था अथवा राज्य सरकार यांनी याबाबत करावयाच्या खर्चाचा वाटा उचलणे व स्थानिक लोक वा संस्था व सरकार यांचेकडून आर्थिक मदत मिळविणे आणि नवीन रस्ते बांधणीची व अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची निगा ठेवण्याची संस्थेवर सोपविली जाणारी जबाबदारी स्वीकारणे.

14) संस्थेचे सभासद, कर्मचारी व संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहणा-या लोकांचा शैक्षणिक, सांस्कृतिक व सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने निरनिराळया योजना हाती घेणे त्या कार्यवाहीत आणणे व त्या चालविणे व त्यासाठी होणारा खर्च सहन करणे.

15) वाहतुकीची साधने खरेदी करणे, भाड्याने देणे व चालविणे.

16) सहकारी अगर अन्य संस्था, सरकार यांचेशी भागीदारी करणे व धंदा उभारणे, खरेदी व विक्री करणे.

17) साखर व तदनुषंगिक व्यवसाय पोषक असे प्रयोग हाती घेणे, प्रयोग व संशोधन केंद्र उभारणे व अस्तित्वात असलेल्या संशोधन व प्रयोग शाळांना मदत करणे.

18) उपविधी 4 प्रमाणे भांडवल उभारणे व सोसायटीच्या मालमत्तेच्या तारणावर अगर बिगर तारणावर इंडस्ट्रियल फायनान्स् कार्पोरेशन ऑफ इंडिया अगर अन्य संस्थांकडून जरूर ते भांडवल कर्जरूपाने उभे करणे.

19) संस्थेचे वरील उद्येश साध्य करणेसाठी इतर सर्व पोषक असणा-या बाबी हाताळणे.

## 4·4 दैनंदिन ऊस गाळप क्षमता -

कारखान्याची दैनंदिन ऊस गाळप मंजूर क्षमता 1250 मे·टन असून उभारलेली दैनंदिन ऊस गाळप क्षमताही 1250 मे· टन आहे·

## 4·5 कारखान्याचे ठिकाण व जवळचे साखर कारखाने -

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना लि· हा कारखाना महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील वाळवे येथे स्थापन झाला असून सांगलीपासून वाळवे गाव 35 कि·मी· अंतरावर आहे· सांगली जिलह्यात मिरज, तासगांव, जत, कवठेमहंकाळ, खानापूर, आटपाडी, वाळवा व शिराळा असे 8 तालुके आहेत· त्यापैकी वाळवा तालुक्यातील 10 गावे व तासगांव तालुक्यातील 5 गावे हे कारखान्याचे कार्यक्षेत्र आहे·

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखानाच्या सभोवताली 2 कारखाने येतात·

1) राजारामबापू सहकारी साखर कारखाना, साखराळे व
2) शेतकरी सहकारी साखर कारखाना, सांगली

यापैकी राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना हा सांगली जिल्ह्यापासून42 कि·मी· व हुतात्मा कारखान्यापासून 12 कि·मी· अंतरावर असलेल्या इस्लामपूरजवळील साखराळे येथे स्थापन झाला आहे, तर शेतकरी सहकारी साखर कारखाना सांगली येथे स्थापन झाला असून सांगलीपासून 4 कि·मी· अंतरावर व हुतात्मा कारखान्यापासून तो 33 कि·मी· अंतरावर आहे·

## 4·6 कारखान्याचे कार्यक्षेत्र -

कारखान्याच्या कार्यक्षेत्रात 15 गावे येतात· त्यामध्ये 10 गावे वाळवा तालुक्यातील व 5 गावे तासगाव तालुक्यातील आहेत· कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावे पुढीलप्रमाणे आहेत -


**वाळवा तालुक्यातील गावे -**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | वाळवा | 2) | पडवळवाडी |
| 3) | गोटखिंडी | 4) | अहीरवाडी |
| 5) | गाताडवाडी | 6) | लोणारवाडी |
| 7) | नवे खेड | 8) | जुने खेड |
| 9) | मसुची वाडी | 10) | शिरगांव |

**तासगांव तालुक्यातील गावे -**

| | | | |
|---|---|---|---|
| 11) | नागठाणे | 12) | खोलेवाडी |
| 13) | नागराळे | 14) | पुणदीवाडी |
| 15) | पुणदी | | |

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावांचा नकाशा पान क्रमांक 57 वर दिलेला आहे. तसेच गळितासाठी ऊस पुरविणा-या गावांची संख्याही पान क्रमांक 58 वर दिली आहे.




सर्व गावाचे जमिनीचे एकूण क्षेत्र

| अ.नं. | गावाचे नांव | एकूण क्षेत्र हेक्टर | आर |
|---|---|---|---|
| १ | मसूचीवाडी | ३६२ | ५२ |
| २ | जुनेखेड - नवेखेड | ५२६ | ०० |
| ३ | वाळवा - पडवळवाडी - अहिरवाडी | ३५७५ | ३७ |
| ४ | गोटखिंडी - गाताडवाडी - लोणारवाडी | २०६५ | ५२ |
| ५ | पुणदी - पुणदीवाडी | ६३८ | ४८ |
| ६ | नागराळे | २४२ | ०० |
| ७ | विरगाव | २६४ | ०० |
| ८ | नागठाण - खोलेवाडी | १४३७ | ०० |
| | एकूण क्षेत्र | ९६६७ | २९ |

### गळितासाठी ऊस पुरविणारी गावे

| वर्ष | कार्यक्षेत्रातील गावे | कार्यक्षेत्राबाहेरील पण महाराष्ट्रातील गावे | महाराष्ट्राच्या बाहेरील गावे | ऊस पुरविणारी गावे एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| 81-82 | -- | -- | -- | -- |
| 82-83 | -- | -- | -- | -- |
| 83-84 | 15 | 7 | -- | 22 |
| 84-85 | 15 | 138 | -- | 153 |
| 85-86 | 15 | 247 | 15 | 277 |
| 86-87 | 15 | 116 | 3 | 134 |
| 87-88 | 15 | 71 | -- | 86 |
| 88-89 | 15 | 44 | 17 | 76 |
| 89-90 | 15 | 30 | -- | 45 |

**4.7 भागभांडवल -**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये 4,00,00,000/- ﴾रुपये चार कोटीचे﴿ असून ते एकूण 40,000 भागात खालीलप्रमाणे विभागले आहे.

1﴿ प्रत्येकी रुपये 1000 चे दर्शनी किंमतीचे एकूण रु. 1,95,00,000/- ﴾रु एक कोटी पंच्याण्णव लाखाचे﴿ 19,500 भाग उत्पादन सभासदांकरिता राखीव भाग.

2﴿ प्रत्येकी रु 1000 चे दर्शनी किंमतीचे एकूण 5,00,000 ﴾ पाच लाखाचे ﴿ 500 सामान्य भाग सहकारी संस्था व बिगर उत्पादक सभासद याकरिता राखीव भाग.

3﴿ प्रत्येकी रु 1,000 चे दर्शनी किंमतीचे 20,000 भागामध्ये विभागलेले एकूण रुपये - 2,00,00,000 ﴾रुपये दोन कोटीचे﴿ महाराष्ट्र सरकारला दिलेले अग्रहक्काचे परतफेडीचे भाग.

**भागभांडवल**

| वर्ष | सभासद संख्या | शेअर्स संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 30-09-82 | 6348 | 16,844 | 1,48,91,536=00 |
| 30-09-83 | 7424 | 30,137 | 2,88,93,754=00 |
| 30-09-84 | 7329 | 36,303 | 3,54,92,590=00 |
| 30-09-85 | 7567 | 36,366 | 3,55,54,975=00 |
| 30-09-86 | 7789 | 36,639 | 3,59,80,844=60 |
| 30-09-87 | 7900 | 36,752 | 3,62,68,915=45 |
| 30-09-88 | 7955 | 35,812 | 3,64,65,879=96 |
| 30-09-89 | 8062 | 36,916 | 3,65,64,181=50 |
| 30-09-90 | 8132 | 35,996 | 3,59,42,734=85 |

भागभांडवल हे उत्पादक सभासद, सहकारी संस्था सभासद, महाराष्ट्र शासन व शेअर अनामत रक्कम याद्वारे जमा झाले आहे. वरीलप्रमाणे कारखान्याचे भागभांडवल जमा झालेले असून ऊस उत्पादक सभासदामध्ये मागासवर्गीय, अनुसूचित जाती जमाती, अल्पभूधारक, नवबौध्द हे ही सभासद असून त्यांना कारखान्याचे शेअर्स खरेदी करता यावेत म्हणून अनुदान व बिनव्याजी कर्ज मिळवून देण्यात आले आहे.

तसेच नवीन मंजूर झालेल्या शेअर्समधून ज्यांच्या कुटुंबात अजिबात शेअर नाही त्यांनाच शेअर देण्याचे कारखान्याने ठरविले आहे.

**4.8 कारखान्याची आर्थिक परीस्थिती -**

कारखाना उभारणीचे कामी, राज्य सरकारचे हमीवर वित्त संस्थाकडून पुढील तपशीलाप्रमाणे



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

दीर्घ आणि मध्यम मुदतीची कर्जे मिळाली आहेत.

| अ.क्र. | कर्ज देणा-या संस्थेचे नांव | मंजूर कर्जाची रक्कम लाख रु. | 30-9-86 अखेर उचल केलेली रक्कम लाख रु | 2 ऑक्टोबर 1989 अखेर परतफेड लाख रु |
|---|---|---|---|---|
| 1) | आय्.एफ्.सी.आय् | 110=00 | 110=00 | 110=00 |
| 2) | आय्.सी.आय्.सी.आय् | 110=00 | 110=00 | 110=00 |
| 3) | आय्.डी.बी.आय्. | 220=00 | 220=00 | 220=00 |
| 4) | एम्.एस्.सी.बँक मुंबई | | | |
| | अ) मध्यम मुदत | 100=00 | 100=00 | 100=00 |
| | ब) ए.आर.डी.सी. | 15.97 | 15.47 | 15.47 |
| | एकूण ... | 555.97 | 555.47 | 555.47 |

वरीलप्रमाणे असलेल्या सर्व कर्जाची संपूर्ण परतफेड दि. 2 ऑक्टोबर 1989 रोजी केली असून कारखाना कर्जमुक्त झाला आहे. एवढया अल्पावधीत हा कारखाना संपूर्ण कर्जमुक्त झाला हे याचे वैशिष्टय आहे. कर्जमुक्तीचा आनंद देशात वेगळया पध्दतीने साजरा करणारा हा एकच कारखाना की ज्याने सभासद, बिगर सभासद, शेतकरी व कष्टकरी मजूर यांना कर्जफेड आनंदाप्रित्यर्थ कार्यक्षेत्रात घरोघरी जिलेबी वाटून आनंद व्यक्त केला.

वरील कर्जाची परतफेड 1984-85 या वर्षापासून पाच वर्षात करण्यात आली. वस्तूतः या कर्जाची परतफेड 1983-84 या वर्षापासून कराराप्रमाणे होणार होती परंतू कारखान्याच्या चाचणी गळित हंगामात अपेक्षित गाळप न झाल्यामुळे परतफेडीची मुदत एक वर्षाने पुढे वाढवून देण्याची विनंती वित्तसंस्थांनी मान्य केली.

या व्यतिरिक्त प्रत्येक वर्षी चाचणी गळित हंगामाकरिता पूर्व हंगामी कर्ज व खेळते भांडवल

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून मिळाले आहे. हे कर्ज हंगामातील अपेक्षित ऊस गाळप आणि सरासरी साखर उता-याच्या प्रमाणात होणारे एकूण उत्पादन विचारात घेऊन मंजूर केले आहे.

**कर्जाचा तपशील**

| वर्ष | मालतारण कर्ज लाख रु | नजरगहाण कर्ज लाख रु | पूर्वहंगामी कर्ज (स्पेशल क्लीन कॅशक्रेडिट) लाख रु |
|---|---|---|---|
| 1983-84 | 200=00 | 10=00 | 15=00 |
| 1984-85 | 400=00 | 20=00 | 40=00 |
| 1985-86 | 450=00 | 20=00 | 25=00 |
| 1986-87 | 495=00 | 20=00 | 20=00 |
| 1987-88 | 550=00 | 20=00 | 20=00 |
| 1988-89 | 550=00 | 25=00 | मागणी केली नाही. |
| 1989-90 | 400=00 | मागणी केली नाही | मागणी केली नाही. |

**अल्पबचत गुंतवणूक -**

साखर कारखान्याचा चाचणी गळित हंगाम 1983-84 ला सुरु झाला. ऊसाच्या अंतिम बिलातून प्रतिटन रु. 1/- याप्रमाणे प्रत्येक वर्षी अल्पबचत रक्कम म्हणून कपात करुन घेतलेली आहे. सन 1986-87 च्या हंगामाअखेर कपात केलेली रक्कम रु. 6,08,140/- ही कारखान्याचे नांवे नॅशनल सेव्हिंग्ज सर्टीफिकेटस् व किसान विकास पत्रात गुंतविलेली आहे. सदरच्या रकमा पोस्टातून व्याजासह परत मिळाल्यानंतर सभासद शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केल्या जातील.

सन 1987-88 व 1988-89 च्या हंगामांच्या अंतिम ऊस बिलातून शंभराच्या पटीत कपात केलेली अल्पबचतीची रक्कम सभासदांचे वैयक्तिक नावावर गुंतविलेली असून पोस्ट ऑफिसकडून


त्यांची सर्टीफ्केटस् मिळताच ती सभासदांना देण्यात येतील. शंभराच्या पटीत नसलेली रक्कम सभासदांना परत केलेली आहे. तसेच कारखान्याने सभासदांची परतीची ठेवीची रक्कम तर बिनशर्त परत दिलेली आहेच पण प्रत्येक वर्षी उत्पादक सभासदाकडून बिनपरतीची ठेव म्हणून गोळा केलेली रक्कमही कारखान्याने परत दिली आहे. तसेच बिगर सभासदांच्याही परतीच्या व बिनपरतीच्या ठेवी परत दिल्या आहेत. असे उदाहरण महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही कुठे नाही.

## 4.9 कारखान्याची प्रगती -

खालील तक्ते आपणास कारखान्याची प्रगती कशी होत गेली त्यासंबंधी कल्पना देतात.

1) उत्पादित साखर (क्विंटल)

| वर्ष | पांढरी | ब्राऊन (प्रक्रियेतील) | एकूण |
|---|---|---|---|
| 1983-84 | 48186 | 528 | 48714 |
| 1984-85 | 137853 | 454 | 138307 |
| 1985-86 | 234665 | 521 | 235186 |
| 1986-87 | 308636 | 550 | 309186 |
| 1987-88 | 341868 | 560 | 342428 |
| 1988-89 | 321048 | 775 | 321823 |
| 1989-90 | 396080 | 650 | 396730 |
| 1990-91 | 356780 | 585 | 357365 |



उत्पादित साखर § लाख क्विंटल §
1983-84 ते 1990-91
आलेख क्रमांक 1
उत्पादित साखर (लाख क्विंटल)
0
0·4
0·8
1·2
1·6
2
2·4
2·8
3·2
3·6
4
0·48
1·38
2·35
3·09
3·42
3·21
3·96
3·57
1983-84
1984-85
1985-86
1986-87
1987-88
1988-89
1989-90
1990-91
वर्ष

## 2) हंगामातील ऊस गाळप

| वर्ष | हंगामातील ऊस गाळप (पूर्ण टनात) |
|---|---|
| 1983-84 | 39452·555 |
| 1984-85 | 117071·175 |
| 1985-86 | 196444·995 |
| 1986-87 | 253571 |
| 1987-88 | 281049 |
| 1988-89 | 259851 |
| 1989-90 | 313112 |
| 1990-91 | 283279·025 |

हंगामातील उसगाळप ( लाख टन )

आलेख क्र. 2



### 3 ) कामगारसंख्या


कारखान्याची प्रगती कारखान्यात काम करणा-या कामगारांच्या संख्येवरुनही अभ्यासली जाते. सुरुवातीपासून आतापर्यंत या कारखान्यातील कामगारांची संख्या कशी वाढत गेली ते पुढील कोष्टकात दर्शविले आहे.

**कामगारांची संख्या**

| वर्ष | कायम | हंगामी | एकूण कामगार संख्या |
|---|---|---|---|
| डिसेंबर 84 | 327 | 212 | 539 |
| डिसेंबर 85 | 334 | 241 | 575 |
| डिसेंबर 86 | 335 | 237 | 572 |
| डिसेंबर 87 | 433 | 232 | 685 |
| डिसेंबर 88 | 485 | 219 | 704 |
| डिसेंबर 89 | 477 + 4 | 240 | 721 |
| डिसेंबर 90 | 474 + 6 प्रशिक्षणार्थी | 239 | 719 |
| मे 91 | 475 + 6 प्रशिक्षणार्थी | 239 | 720 |

कामगारसंख्या

आलेख क्र. ३




### 4) साखर विक्री किंमत

| वर्ष | एकूण किंमत (कोटी रु.) |
| --- | --- |
| 1983-84 | 1·09 |
| 1984-85 | 6·63 |
| 1985-86 | 9·97 |
| 1986-87 | 13·11 |
| 1987-88 | 16·58 |
| 1988-89 | 28·91 |
| 1989-90 | 22·74 |

साखर विक्री किंमत ( कोटी रु. )


आलेख क्र. 4



## 5) नफातोटा

| वर्ष | नफा रुपये | तोटा रुपये |
|---|---|---|
| 1980-81 | -- | 41,633=85 |
| 1981-82 | -- | 1,79,694=80 |
| 1982-83 | -- | 8,50,867=09 |
| 1983-84 | -- | 1,41,32,320=60 |
| 1984-85 | 1,10,19,319=78 (व्यापारी नफा) | -- |
| 1985-86 | 1,76,23,589=61 | -- |
| 1986-87 | -- | 2,14,598=49 |
| 87-88 व 88-89 (2 हंगाम) | 4,29,26,140=62 | -- |
| 1989-90 | 3,61,67,497=72 | -- |

वर दिलेला तोटा हा कागदोपत्री आहे. याचे कारण घसारा त्यावर्षी जादा आकारण्यात आलेला आहे व हा तोटा भरून काढण्यात आलेला आहे.


नफातोटा (लाख रु.)
आलेख क्र. 5
नफा
तोटा
नफातोटा (लाख रु.)
0
40
80
120
160
200
240
280
320
360
400
430
1·79
8·50
141·32
110·19
176·23
2·14
429·26
361·67
1981-82
1982-83
1983-84
1984-85
1985-86
1986-87
1987-88
88-89
1989-90
वर्ष

## 6§ साखर विक्री §क्विंटल§

| वर्ष | देशांतर्गत नियंत्रीत | देशांतर्गत खुली |
|---|---|---|
| 81-82 | -- | -- |
| 82-83 | --- | -- |
| 83-84 | 21,492 | 10,895 |
| 84-85 | 34,366 | 1,18,119 |
| 85-86 | 35,980 | 1,72,673 |
| 86-87 | 69,660 | 2,02,052 |
| 87-88 व 88-89 | 23,040 | 4,98,950 |
| 89-90 | 63 | 3,18,776 |

## 7) गळित हंगाम

| वर्ष | गळिताचे स्थूल दिवस |
|---|---|
| 81-82 | -- |
| 82-83 | -- |
| 83-84 | 47 |
| 84-85 | 132 |
| 85-86 | 148 |
| 86-87 | 152 |
| 87-88 | 172 |
| 88-89 | 159 |
| 89-90 | 198 |
| 90-91 | 168 |

8) मछली उत्पादन

| वर्ष | मछली उत्पादन (टन) |
| --- | --- |
| 1983-84 | 1318 |
| 1984-85 | 4174 |
| 1985-86 | 7354 |
| 1986-87 | 9064 |
| 1987-88 | 9625 |
| 1988-89 | 9527 |
| 1989-90 | 11383 |
| 1990-91 | 10124·6 |

९) प्रतिटन ऊसाशी बगॅसचे प्रमाण

| वर्ष | प्रतिटन ऊसाशी बगॅसचे प्रमाण (टक्के) |
|---|---|
| 81-82 | -- |
| 82-83 | -- |
| 83-84 | 33·92 |
| 84-85 | 31·42 |
| 85-86 | 30·31 |
| 86-87 | 28·11 |
| 87-88 | 28·52 |
| 88-89 | 30·92 |
| 89-90 | 31·30 |
| 90-91 | 30·82 |

4·10 कारखान्यातील साखर उतारा -

भारतामध्ये सर्वात जास्त साखर उतारा मिळविणारा व शेतक-यांच्या ऊसाला सर्वात जास्त दर देणारा कारखाना म्हणून सर्वत्र हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना ओळखला जातो·

**सरासरी साखर उतारा व ऊसाचा खरेदी दर**

| वर्ष | सरासरी साखर उतारा | ऊसाचा खरेदी दर प्रतिटन (रु) |
|---|---|---|
| 81-82 | -- | -- |
| 82-83 | -- | -- |
| 83-84 | 12·35 | 252 |
| 84-85 | 11·89 | 330 |
| 85-86 | 12·08 | 395 |
| 86-87 | 12·18 | 401 |
| 87-88 | 12·17 | 435 |
| 88-89 | 12·37 | 485 |
| 89-90 | 12·65 | 685 |
| 90-91 | 12·60 | 530 |

सदर साखर उतारा हा देशात प्रथम क्रमांकाचा आहे· मागील सलग पाच हंगामात हा कारखाना साखर उता-याच्या बाबतीत देशात प्रथम क्रमांकावर होता· तसेच तांत्रिक कार्यक्षमतेबद्दलचा वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, पुणे यांचा 1990-91 चा उच्च साखर उतारा विभागातील प्रथम क्रमांक या कारखान्यास मिळाला आहे· साखर उतारा वाढविण्यासाठी या कारखान्याने बरेच निरनिराळे प्रयत्न केले आहेत व दक्षता घेतली आहे ती पुढीलप्रमाणे -

1) ऊसलागण तारखेप्रमाणे प्रथम तोडणी क्षेत्राची क्रमवारी लावली जाते·

2) वरीलप्रमाणे क्रमवारी लावलेनंतर ऊसाचे नमुने प्रत्यक्ष प्रयोगशाळेत आणून तपासले जातात.

3) नमुने तपासलेनंतर ऊसाचे परिपक्वतेनुसार ऊस तोडणीचा कार्यक्रम ठरविला जातो व प्रत्यक्ष ऊस गाळपासाठी कारखान्यावर आल्यानंतर परत नमुने तपासले जातात. यावेळी जर अपेक्षित परिपक्वता नसेल तर ताबडतोब ऊसाची तोडणी थांबविली जाते.

4) ऊस तोडणी व गाळप यामधील अंतर कमीतकमी करणेसाठी रात्रपाळीने ऊसाची तोडणी केली जाते. यासाठी कारखान्याने खास व्यवस्था केली आहे.

5) गळितासाठी आणलेला ऊस स्वच्छ ठेवणे व मोळी बांधणीसाठी वापरलेले वाढे गव्हाणीमधून बाहेर टाकणे याबाबत कारखाना अधिक दक्षता घेत असतो, त्याचप्रमाणे ऊसाची तोड जमिनीलगत घासून करणेबाबतही दक्षता घेतली जाते.

6) ऊस पिकाची वाढ जोमदार व्हावी यासाठी सेंद्रिय खतांचा वापर करण्याच्या दृष्टीने कारखान्याने सर्व शेतक-यांना मोफत ताग बी देण्याची व्यवस्था केली आहे.

7) बगॅसमधून वाया जाणारे साखरेचे प्रमाण कमी करून कारखान्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी कारखान्यावर इम्बीबिशन पाण्याचा वापर 200 टक्के फायबरच्या दरम्यान केला जातो.

8) मळी व प्रेसमड मधून वाया जाणारे साखरेचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने देखील कारखान्यातील कामगार दक्ष असतात.

या सर्व प्रयत्नातून साखर उतारा निश्चित वाढू शकतो हे कारखान्याने सलग पाच गळित हंगामात देशात प्रथम क्रमांकाचा साखर उतारा मिळवून सिध्द केलेले आहे.

शेतकरी, कामगार व ऊसतोडणी मजूर आणि इतर सर्वांच्या सामुदायिक प्रयत्नातून साखर उतारा वाढवून त्या साखर उता-याचा मोबदला शेतकरी, कामगार, तोडणी मजूर व सामाजिक विकासाच्या कामासाठी समप्रमाणात विभागून देण्याचा एक अभिनव उपक्रम कारखान्याने सुरु केलेला आहे जो देशातील इतर कोणत्याही कारखान्यात नाही.

1991-92 मधील हंगाम - या गळित हंगामातही या साखर कारखान्याने साखर उता-याचे उदिष्ट 12.80 टक्के असे ठरविले आहे.

4·11 ऊस संशोधन व विकास योजना -

या कारखान्याचे "ऊस संशोधन व विकास" हे स्वतंत्र खाते आहे· या खात्यामार्फत आडसाली, सुरु व खोडवा पिकास लागणा-या नत्र - स्फुरद व पालाश अन्न घटकांच्या वार्षिक मात्राबाबतची माहिती, पाण्याचा योग्य वेळी व योग्य प्रमाणात वापर कसा करावा, आंतर मशागतीची कामे, रोग व किडीपासून ऊस पिकाचे संरक्षण कसे करावे याबाबत ऊस उत्पादकांना सातत्याने मार्गदर्शन केले जात आहे· तसेच दरएकरी ऊस उत्पादन वाढीबरोबरच साखर उतारा वाढविण्याच्या दृष्टीचे आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्याचे काम हाती घेतलेले आहे· सुरुवातीच्या काळात ऊस विकासाच्या दृष्टीने थोडेफार प्रयत्न झाले होते· शेतक-यांना नवीन व संशोधन केंद्राकडील बियाणे, खते, औषधे वगैरे कारखानयाकडून पुरविली होती· त्यानंतरच्या काळात याबाबतीत सातत्य टिकवता आले नाही· अलीकडे मात्र या कामाची व्याप्ती वाढलेली असून त्या अंतर्गत अनेक कामे हाती घेण्यात आली आहेत· सध्याच्या काळात पिढयान् पिढया चालत आलेली शेतीची पध्दत वापरून एकरी 25 - 30 मे· टन ऊसाचे उत्पादन काढणे शेतक-याला परवडण्यासारखे नाही· शेती उपयोगी मालाच्या वाढत्या किंमती व दैनंदिन जीवनातील आवश्यक वस्तूंच्या/सेवांच्या वाढत्या किंमती यामुळे शेतक-यांना जास्तीत जास्त तंत्रशुध्द पध्दतीने शेती करण्याशिवाय आता पर्याय नाही· असे केले तरच तो या महागाईच्या काळात टिकू शकणार आहे· शेतीच्या नवीन पध्दती, ऊसाच्या बेण्याच्या बाबतीत चांगल्या जाती, खताचा वापर यादृष्टीने शेतक-यांना मार्गदर्शन करून जास्तीत जास्त उत्पादन काढण्याच्या दृष्टीने कारखान्याकडून पुढील योजना राबविल्या जात आहेत·

1) माती तपासणी -

वर्षानुवर्षे एकाच जमिनीत फेरपालट न करता ऊसासारख्या पिकाची वारंवार लागवड करण्यात येत असल्याने जमिनीची सुपीकता व उत्पादक क्षमता ही दिवसेंदिवस कमी होत चालली आहे· याकरिता ऊस उत्पादक शेतक-यांच्या जमिनीतील मातीचे 1984-85 साली 317 तर मे 1986 मध्ये 192 नमुने घेऊन त्यांची तपासणी सहाय्यक मृद् रसायनशास्त्रज्ञ यांच्याकडून करुन घेतली· माती तपासणीनंतर मृद् रसायन शास्त्रज्ञांच्या शिफारशीप्रमाणे वरखते व भर खते यांचा वापर करणे किती महत्वाचे आहे हे शेतक-यांना समजावून सांगून त्याप्रमाणे कार्यवाही करुन घेण्याचे काम कारखान्याने चालू केले आहे·

2) ऊस बेणे / ऊस रोप मळा -

ऊसाच्या दरएकरी सरासरी उत्पादनात व साखर उता-यात भरीव अशी वाढ व्हावी म्हणून आपल्या कार्यक्षेत्रातील शेतक-यांना ऊस लागवडीसाठी शुध्द, निरोगी, कोवळे व जोमदार ऊस बेणे पुरविण्याचे काम कारखान्याने हाती घेतले आहे. यासाठी प्रथम 1981-82 सालामध्ये कार्यक्षेत्रातील गावागावातून सभासदांचे शेतावर एकूण 20 एकर 8 गुंठे क्षेत्रावर ऊस बेणे तयार करण्यात आले, त्यासाठी बेणे, खते, जंतुनाशके इ. उधार पुरविली, त्यावर रु. 36,565/- खर्च झाला व 1982-83 यासाली त्यांची विक्री करण्यात आली, तसेच ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव येथून अडसाली, पूर्वहंगामी आणि सुरु लागवडीकरता अनुक्रमे को-740, को-7219 व को.एम-7125 या जातीचे बेणे प्लॉट तयार केले आहेत व या बेण्याचे वितरण त्रिस्तरीय पध्दतीने सुरु केलेले आहे. उत्तम व चांगले गुणधर्म असलेल्या ऊस बेण्याचा कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादकांना सातत्याने पुरवठा व्हावा व किमान 5 वर्षांनी बेणे बदलता यावे यासाठी त्रिस्तरीय बेणे मळ्याची योजना आखणे आवश्यक असल्याने कारखान्याने ऑगस्ट 1985 मध्ये मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र येथून को-740 जातीचे ऊसाचे कोवळे, निरोगी व जोमदार ऊस बेणे आणले होते. सदर 20,000 ऊस बेण्यांची 1 एकर 20 गुंठे क्षेत्रावर लागवड करून शास्त्रोक्त पध्दतीचा प्रथम स्तरीय ऊस बेणे मळा तयार करण्यात आला होता.

डिसेंबर 1986 मध्ये 10 एकर क्षेत्रावर ऊसाचे रोपमळे तयार केले होते. त्याचप्रमाणे ऑगस्ट व सप्टेंबर 1987 मध्ये 23.20 एकर क्षेत्रावर रोपमळे तयार केले होते. या रोपमळ्यातील ऊस पीकास वेळेवर खते व औषधे उपलब्ध व्हावीत म्हणून कारखान्याने या रोपमळ्यास प्रतिएकरी वरखते व औषधे यासाठी रुपये 4,500/- ची बिनव्याजी रक्कम दिली होती. या सर्वच ऊस रोपमळ्यातील ऊस बेणे हे विक्रीसाठी ऑक्टोबर 1987 व जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर 1988 मध्ये उपलब्ध झाले व त्यापासून नवीन अंदाजे 200 ते 450 एकर क्षेत्रात ऊस लागण होऊ शकली. ऑक्टोबर 1937 ते डिसेंबर 1987 अखेर 15.20 एकर क्षेत्रावर रोपमळे तयार केले तर ऑगस्ट 1988 मध्ये 2.15 एकर क्षेत्रावर रोपमळे तयार केले. या रोपमळ्यातील ऊस बेणे सप्टेंबर ते ऑक्टोबर 1988 पासून जुलै 1989 पर्यंत वाटपासाठी उपलब्ध झाले व त्यापासून नवीन अंदाजे

300 ते 450 एकर ऊस लागण झाली. तसेच जुलै 1989 ते ऑक्टोबर 1989 अखेर 16.28 एकर क्षेत्रावर रोपमळे तयार केले. या रोपमळयासाठीसुध्दा खतपुरवठा व औषधे उपलब्ध व्हावीत म्हणून कारखान्याने प्रतिएकरी रु 4,500/- रक्कम बिनव्याजी दिली होती. यातून अंदाजे 300 ते 320 एकर क्षेत्रात ऊसाची नवीन लागण झालेली आहे.

3) ऊस बेणे वाटप -

1982-83 सालामध्ये 20 एकर 8 गुंठे क्षेत्रावर तयार करण्यात आलेले बेणे विक्री करण्यात आले, तर 1984-85 साली ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथून आणून तयार केलेल्या को-740, को-7219, व को.एम. 7125 या जातीच्या बेणे प्लॉटसमधील बेण्याचे वितरण त्रिस्तरीय पध्दतीने सुरू केले. तसेच को-7219 व को.एम.7125 या जास्त साखर उतारा देण्या-या जातींना त्यांचा लागण हंगाम व पक्वता कालावधी आणि ऊसतोड यादृष्टीने एकरी रु.500/- अनुदान खत रुपाने देण्याचा उपक्रम कारखान्याने राबविला, त्याला चांगलाच प्रतिसाद मिळाला.

प्रथमस्तरीय बेणे मळयातील बेणे विक्रीस तयार होताच कार्यक्षेत्रातील 21 शेतक-यांना द्वितीयस्तरीय बेणे मळा तयार करण्याकरिता ऑगस्ट व सप्टेंबर 1986 मध्ये 13 एकर 8 गुंठे क्षेत्रासाठी तीन डोळयांच्या 134500 ऊस बेण्याची विक्री प्रति हजारी रु. 75/- प्रमाणे करण्यात आली, तर 1987-88 लागण हंगामात माहे जुलै 87 ते 30 सप्टेंबर 87 या दरम्यान 163 शेतक-यांना 150 एकर ऊस लागणीसाठी 17,94,130 ऊस बेणे विक्री करण्यात आले. सन 1988-89 च्या लागण हंगामात माहे जून 88 ते 31 मार्च 89 अखेर 470 शेतक-यांना 440.19 एकर क्षेत्रासाठी ऊस बेणे वाटप करण्यात आले.

जुलै 89 ते डिसेंबर 89 अखेर एकूण 135 शेतक-यांना 128.04 एकर लागण क्षेत्रासाठी ऊस बेणे वाटप करण्यात आले.

4) सूक्ष्म अन्न द्रव्ययुक्त खतांचा पुरवठा -

ऊसाची योग्य व समाधानकारक वाढ ही अनेक घटकांबरोबरच खतामुळेही नियंत्रित होत

असते, ऊसाची योग्य वाढ ही ऊसामधील चयापचयांच्या रासायनिक क्रियांवर अवलंबून असते. या क्रिया नत्र, स्फुरद व पालाश या मुख्य अन्न घटकांबरोबरच झींक, मँगेनीज, लोह, बोरॉन, क्लोरिन, मॉलीबडेनम् व कॉपर यासारख्या सूक्ष्म अन्न घटकांवर अवलंबून असतात. या घटक द्रव्यांची ऊस पिकास उपलब्धता व्हावी व ऊस उत्पादनात वाढ व्हावी यासाठी कारखान्याने प्रतिएकरी खतांच्या दोन पिशव्या प्रमाणे अॅग्रोमीन पिशव्या, विपुल पिशव्या, फर्टिलेड पिशव्या (प्रत्येकी 10 किलो वजनाच्या) कार्यक्षेत्रातील शेतक-यांना त्यांच्या मागणीनुसार पुरविल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे-

पुरविलेल्या पिशव्यांची संख्या

| अहवाल साल | अॅग्रोमीन | विपुल | फर्टिलेड |
|---|---|---|---|
| 1986-87 | 1150 | -- | -- |
| 1987-88 | 1388 | 989 | 416 |
| 1988-89 | 1388 | 989 | 416 |
| 1989-90 | 551 | 381 | 434 |

याशिवाय 1986-87 मध्ये क्षार फुटलेल्या जमिनी लागवडीखाली याव्यात म्हणून 11 ऊस उत्पादक शेतक-यांना 116.720 मे.टन जिप्समचा पुरवठा करण्यात आला आहे. खतांच्या पुरवठयाबरोबरच तंत्रज्ञांनी खतांच्या वापराबाबत शास्त्रीय माहिती ऊस उत्पादकांना दिली आहे.

5) ताग बी पुरवठा -

सेंद्रिय खते जमिनीचे हृदय असून ऊस उत्पादनात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शेणखत, कंपोस्ट खत इत्यादी सेंद्रिय खतांचा अपुरेपणा व दुर्मिळता विचारात घेता जमिनीची सुपीकता व उत्पादनक्षमता वाढवून दरएकरी अधिक उत्पादन मिळविण्यासाठी हिरवळीचे खत तयार करणे ही एक गरजेची व सहज शक्य बाब आहे. कारखान्याने त्यासाठी 1989-90 या अहवालसालात 50 टक्के सबसिडीवर 123 शेतक-यांना 7413 किलो ताग बियाणे पुरविले आहे. पुढील हंगामात 100 टक्के शेतक-यांनी हिरवळीच्या खतांचा वापर करावा यासाठी कारखाना प्रयत्नशील आहे.

यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहील व दरएकरी ऊस उत्पादनात निश्चितच 12 ते 15 मे. टनापर्यंत वाढ होईल अशी अपेक्षा आहे.

6) बायोगॅस अनुदान -

इंधनाची बचत व्हावी व खेडेगावातील लोकांचे आरोग्य सुधारावे यासाठी 20 कलमी कार्यक्रमांतर्गत बायोगॅस संयंत्र बांधण्याची योजना चालू आहे. शेणाचा वापर शेणी (गोव-या) तयार करून सरपणासाठी होऊ नये, त्याऐवजी शेणापासून बायोगॅस निर्मिती व खतनिर्मिती करून बायोगॅसचा इंधनाकरिता तर खताचा शेतजमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी वापर व्हावा, त्याचप्रमाणे वृक्षतोडीस पायबंद बसावा म्हणून महाराष्ट्र सरकारने बायोगॅस अनुदान योजना शेतक-यांना चालना देण्यासाठी चालू केली आहे. त्यानुसार या कारखान्याने पुढीलप्रमाणे अनुदान मंजूर करून त्याचे वाटपही केलेले आहे.

| वर्ष | शेतक-यांची संख्या | अनुदान रक्कम रुपये (प्रत्येकी रु.2000 प्रमाणे.) |
|---|---|---|
| 1986-87 | 50 | 99,000 |
| 1987-88 | 51 | 1,01,000 |
| 1988-89 | 198 | 3,92,000 |

7) शेतकरी मार्गदर्शन -

दरएकरी ऊस उत्पादन वाढावे, साखर उता-यात वाढ व्हावी, यासाठी जमिनीचा पोत कसा टिकवावा व त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी शेतक-यांनी कोणत्या प्रकारे प्रयत्नशील राहण्याची गरज आहे याविषयी मार्गदर्शन कार्यक्षेत्रातील शेतक-यांना कारखान्याच्या ऊस विकास व संशोधन खात्याकडून करण्यात येत असते. याशिवाय शेतक-यांना जमीन, पाणी, खते, बेणे याबद्दल व रोगराई व कीड यांचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने गावोगांवी चर्चासत्रे, बैठका व समक्ष मार्गदर्शन करणे हा शेतक-यांच्या व ऊस उत्पादकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा कार्यक्रम राबविला जात आहे.

8) मागासवर्गीय अनुदान -

राज्य शासनाच्या योजनेप्रमाणे कार्यक्षेत्रातील मागासवर्गीय अल्पभूधारकांपैकी ज्यांनी ऊस हे पीक घेतले असेल अशा सभासदांना राज्य सरकारतर्फे अनुदान देण्यात आलेले आहे ते पुढीलप्रमाणे-

| वर्ष | मागासवर्गीय व अल्पभूधारक सभासद | अनुदान रु. |
|---|---|---|
| 1983-84 | 13 | 18,350=00 |
| 1984-85 | 9 | 8,700=00 |
| 1985-86 | 8 | 8,337=50 |
| 1986-87 | 8 | 4,312=50 |
| 1987-88 )<br>1988-89 ) | 100 | 1,33,874=75 |
| 1989-90 | 85 | 67,678=75 |

## 4.12 पाणीपुरवठा योजना -

कारखाना ऊसाच्या बाबतीत पूर्णपणे स्वावलंबी व्हावा यासाठी कारखान्याने आपल्या कार्यक्षेत्रातील ऊस लागवडीखालील क्षेत्र वाढण्यासाठी व ऊसाला शाश्वत स्वरूपात पाण्याची सोय व्हावी यासाठी उपसा जलसिंचन योजना राबविण्याचे काम हाती घेतले असून खालील योजना पूर्ण झाल्या आहेत.--

| अ.क्र. | योजनेचे )स्कीम) नाव | त्यामुळे भिजणारे क्षेत्र |
|---|---|---|
| 1) | श्री. गजानन उपसा जलसिंचन योजना, नवेखेड नं. 1,2 | 125 एकर |
| 2) | श्री म्हसोबा उपसा जलसिंचन योजना, वाळवे | 70 -"- |
| 3) | श्री वसंत जलसिंचन योजना, नागठाणे नं. 3 | 50 -"- |

| अ.क्र. | योजनेचे ॥स्कीम॥ नांव | त्यामुळे भिजणारे क्षेत्र |
|---|---|---|
| 4॥ | कारखाना इ.टी.पी. स्कीम, वाळवे | 300 एकर |
| 5॥ | वसंत जलसिंचन योजना, नागठाणे नं. 2 | 150 -"- |
| 6॥ | भिमबाबा पाणीपुरवठा योजना, पुणदी ॥मागासवर्गीय॥ | 15 -"- |
| 7॥ | सिध्दार्थ सहकारी पाणी पुरवठा योजना मर्या. नागठाणे ॥मागासवर्गीय॥ | 40 -"- |
| | एकूण ... | 750 -"- |

वरील योजनाशिवाय आणखी काही पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कारखाना प्रयत्नशील आहे, त्या पुढीलप्रमाणे -

1॥ नियोजित वसंत पाणीपुरवठा सह.संस्था मर्यादित, गोटखिंडी -

कारखान्याने ही 2000 एकर जमीन ओलिताखाली आणण्याची योजना हाती घेतली असून या योजनेचे इंटेक चेंबर, इंटेक पाईपलाईनचे काम पूर्ण झालेले आहे. जॅकवेलचे काम 2 मीटर ऊंचीपर्यंत झालेले असून एका पॉईटचे डिलीव्हरी चेंबर बांधकाम पूर्ण झालेले आहे.

या योजनेचे तारण गहाण खत काम 50 टक्के पूर्ण झालेले आहे. सदरच्या योजनेच्या कागदपत्रांची तपासणी बँकेमार्फत चालू आहे. तारण गहाण खत काम 60 टक्के पूर्ण होताच भूविकास बँक व नाबार्डकडून कर्जाचा हप्ता मिळणार आहे. कर्ज उपलब्ध होताच सदर योजनेचे काम चालू केले जाईल.

2॥ नियोजित किसान नं. 3 पाणीपुरवठा सहकारी संस्था मर्यादित, वाळवा -

सदरची योजना 802 एकर जमीन ओलिताखाली आणण्याची असून योजनेच्या प्लॅन एस्टीमेटला नाबार्डची तांत्रिकदृष्टया मंजूरी मिळाली आहे. योजनेचे तारण गहाण खत काम चालू आहे.

3) नियोजित अहिरवाडी-गाताडवाडी उपसा जलसिंचन योजना -

ही योजना 1350 एकर जमीन ओलिताखाली आणण्याची असून या योजनेची प्लॅन एस्टीमेटस् महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक लि मुंबई, उपशाखा आष्टा यांचेमार्फत नाबार्डकडे मंजूरीसाठी पाठवलेली आहेत. या योजनेच्या नोंदणीच्या (रजिस्ट्रेशनच्या) सर्व कागदपत्रांची पूर्तता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सांगली यांच्याकडे केलेली आहे.

4) नियोजित किसान नं. 4 पाणीपुरवठा योजना, वाळवा -

ही योजना 680 एकर जमीन ओलिताखाली आणण्याची असून किसान नं. 2 सह. पाणीपुरवठा संस्था, मर्यादित वाळवा याजकडून पाणी परवाना वर्ग करून देण्याचे शासनाने मान्य केले आहे. योजनेच्या नोंदणीच्या (रजिस्ट्रेशनच्या) कामाची कागदपत्रे पूर्ण करण्याचे काम चालू आहे.

5) वाघमारे जलसिंचन योजना, शिरगांव (मागासवर्गीय) -

एकूण 18 एकर क्षेत्र असणा-या या योजनेसाठी पाणी परवाना मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. पाणी परवाना मिळताच या योजनेचे काम हाती घेणेचे निश्चित केले आहे.

वरील सर्व नियोजित योजना पूर्ण झाल्यानंतर त्यापासून दरवर्षी अंदाजे 80,000 मे.टन ऊस उपलब्ध होईल.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावोगावी असलेल्या पाणीपुरवठा योजनात (ईरिगेशन स्कीम्स्मध्ये) तांत्रिक बिघाड होऊन तो पुरेशा आर्थिक व तांत्रिक सहाय्याअभावी दुरूस्त होऊ शकत नसलेने शेती-पिकास पाणी मिळणे बंद होते आणि शेतक-यांचे अतोनात नुकसान होते, याचा विचार करून सर्व तांत्रिक सहाय्य मोफत पुरविणेचा महत्वपूर्ण निर्णय कारखान्याने घेतला आहे व त्याची अंमलबजावणीही चालू आहे.

6) भविष्यकालीन पाणीपुरवठा योजना -

याशिवाय कारखान्याकडे सन 1983-84 पासून प्रतिवर्षी प्रति टनास 4 रूपये प्रमाणे ऊस बिलातून कापून घेऊन जी ऊस विकास निधीची रक्कम रु. 53 लाख 85 हजार जमा झालेली आहे त्यामधून कारखान्याच्या कार्यक्षेत्रात 6 पाणीपुरवठा योजनांची कामे चालू असून त्या योजना आक्टोबरपर्यंत कार्यान्वित होतील.

या ऊस विकास निधीतून कार्यक्षेत्रातील जास्तीतजास्त जमिनी ह्या ओलीताखाली व पर्यायाने ऊस लागवडीखाली आणणे व त्यातून ऊस क्षेत्र वाढीबरोबरच खात्रीशीर पाणीपुरवठयाची सोय करून व इतर ऊस विकास योजना राबवून दरएकरी ऊसउत्पादनात तसेच उता-यात (रिकव्हरीत) वाढ करणे असे कारखान्याचे धोरण असून त्या दिशेने कारखाना सातत्याने प्रयत्नशील आहे.

ऊस विकास निधीतून राबवल्या जाणा-या पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर पूर्ण होऊन कार्यान्वित व्हाव्यात यासाठी कारखान्याने त्या योजना सवलतीच्या व्याजदराच्या पध्दतीने पूर्ण करण्याचे धोरण घेतलेले आहे. त्यामुळे या निधीचा उपयोग अभिसरण ( Circulation ) पध्दतीने जास्तीतजास्त योजनांसाठी होऊन योजनाही अल्पावधीत पूर्ण होऊ शकतील. कार्यक्षेत्रात राबविल्या जाणा-या या पाणीपुरवठा योजनांसाठी कारखान्याने दिलेल्या काही सवलती पुढीलप्रमाणे आहेत.

1) पाणीपुरवठा योजना 11 महिन्याच्या आत पूर्ण करणा-या शेतक-यांना ही रक्कम बिनव्याजी देण्यात येत आहे.

2) जे शेतकरी वापरलेली रक्कम 2 वर्षापर्यंत परत करणार नाहीत त्यांच्या रक्कमेवर 4 टक्के दराने व्याजआकारणी करण्यात येणार आहे.

3) जे शेतकरी 3 वर्षापर्यंत रक्कम परत करू शकणार नाहीत त्यांच्या रक्कमेवर 6 टक्के दराने व्याजआकारणी करण्यात येणार आहे.

4) जे शेतकरी 3 वर्षे पूर्ण होऊनही रक्कम परत करणार नाहीत त्यांच्या रक्कमेवर 8 टक्के दराने व्याजआकारणी करण्यात येणार आहे.

ऊस विकास निधीचा विविध विकासांच्या कामासाठी उपयोग व्हावा असे कारखान्याचे धोरण आहे. त्यासाठी अभिसरण ( Circulation ) पध्दती वापरली जाणार आहे. कार्यक्षेत्रातील जास्तीतजास्त क्षेत्र ओलीताखाली आल्यानंतर या निधीचा वापर ऊस विकास व दरएकरी उत्पादन वाढीसाठी करावयाचा असे कारखान्याने ठरविलेले आहे. ऊस विकास निधीतून राबविल्या जात असलेल्या योजना खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | योजनेचे (स्कीमचे) नाव | त्यामुळे भिजणारे क्षेत्र |
|---|---|---|
| 1) | धानाई पाणीपुरवठा योजना, वाळवे | 132 एकर |
| 2) | दत्त पाणीपुरवठा योजना, नवेखेड | 50 -"- |
| 3) | बाहुबली पाणीपुरवठा योजना, वाळवे | 93 -"- |
| 4) | नागेश्वर सहकारी पाणीपुरवठा संस्था मर्या. नागठाणे | 105 -"- |
| 5) | गजानन पाणीपुरवठा योजना, नागठाणे | 49 -"- |
| 6) | राजेंद्र पाणीपुरवठा योजना, पुणदी | 24 -"- |
| | एकूण ... | 453 एकर |

7) जलशुध्दीकरण प्रकल्प -

कारखान्याच्या सुरुवातीच्या गळितापासूनच कारखान्यातून निघणारे अशुध्द पाणी शुध्द करून शेती पिकास वापरणेसाठी जलशुध्दीकरण प्रकल्प उभारणेत आला असून शुध्द पाणी वाळवे गावच्या पश्चिमेकडील कोरडवाहू जमिनीला देणेची सिध्दता केली आहे व त्यायोगे 400 एकर जमीन ओलिताखाली आली आहे. त्यामुळे येथे जलप्रदूषणाचा धोका नाही.

**4.13 कारखान्याकडून केली जाणारी इतर कामे -**

1) गावठाण रस्त्यांचे डांबरीकरण -

कार्यक्षेत्रातील 15 गावातील गावठाण रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कारखान्याचे धोरण असून त्यानुसार रस्त्यांच्या खडीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे. डांबरीकरणाचे काम गेल्या वर्षीपासून हाती घेतले आहे. यासाठी कारखान्याने स्वनिधीतून 49 लाख रुपये खर्च केला आहे.

2) ऊस तोडणी मजुरांसाठी निवारा -

कारखान्याच्या विकासामध्ये शेतकरी व कामगार याप्रमाणेच ऊसतोडणी मजूरही तितकाच जबाबदार घटक असलेने हंगामातील त्याच्या सुरक्षिततेसाठी कारखाना शक्य ती सर्व जबाबदारी उचलत असतो. उदाहरणार्थ 1989-90 या वर्षापासून ऊस तोडणी मजुरांना राहण्यासाठी खोल्या बांधून देण्यात येत आहेत.

3) शैक्षणिक विकास -

कार्यक्षेत्रातील लहान वयोगटातील मुलांचे लक्ष शिक्षणाकडे आकर्षित व्हावे व शिक्षण क्षेत्रात प्रगती व्हावी यासाठी कारखान्याने कार्यक्षेत्रात एकूण 22 नवीन बालवाडया चालू केल्या आहेत. तेथील कर्मचा-यांना कारखान्यामार्फत दरमहा रु. 125/- मानधन दिले जाते. तसेच खेळाचे विविध संच व इतर स्टेशनरी यांचाही पुरवठा केला जातो.

याशिवाय कार्यक्षेत्रातील शाळांना शक्य त्याप्रमाणे विविध कामासाठी सहाय्य करण्याचे कारखान्याचे धोरण आहे.

4) किशोरवयातील व तरूण मल्लांना मानधन -

कार्यक्षेत्रातील किशोर वयातील मुलांना व तरूणांना कुस्तीसाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी कारखाना परिसरात मैदान भरविण्यात येते. या स्पर्धेमध्ये 48 किलो ते 68 किलोपर्यंत

वजनगट व 68 किलोच्यावर मुक्त गट याप्रमाणे प्रत्येक वजन गटात प्रथम व द्वितीय क्रमांकाने विजयी होणा-या मल्लांना कारखान्यामार्फत वजन गटाप्रमाणे रु. 300/- पासून रु. 550/- पर्यंत दरमहा मानधन देण्यात येते.

5) आरोग्यसुविधा व वैद्यकीय मदत -

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व जनतेचे आरोग्य सुधारावे, आरोग्याविषयीचे महत्व त्यांना समजावे व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांनाही औषधोपचार घेता यावा यासाठी 1989-90 याकाळात कारखान्याने 3 वेळा आरोग्यशिबिरे भरविली होती. या शिबिरांसाठी सभासद, बिगर सभासद अशा सर्वांना प्रवेश दिलेला होता. "लायन्स् क्लब ऑफ मिरज" मार्फत विविध रोगांवरील तज्ञ डॉक्टर्सनी त्यात भाग घेतला होता. या शिबिरांमधून लहान मुले तसेच इतर वयोगटातीलही स्त्री-पुरुष अशा एकूण 5300 रुग्णांची तपासणी करण्यात आली. रुग्णांना कारखान्यामार्फत मोफत वैद्यकीय सेवा देण्यात आली.

दरवर्षी हंगाम संपल्यानंतर 15 मे च्या सुमारास अशाप्रकारचे शिबीर भरविण्याचे कारखान्याने ठरविलेले आहे. त्याप्रमाणे यावर्षी रविवार दिनांक 23 जून 1991 रोजी लायन्स् क्लब, लायनेस क्लब आणि लिओ क्लब मिरज आणि हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना यांच्यावतीने सर्वरोग रुग्ण तपासणी शिबीर पार पडले. खेडयातील गरीब जनतेला तज्ञ डॉक्टरांची फी भरणेची ताकद नसते, म्हणून त्यांना थोडी मदत व्हावी व स्त्री रुग्णांची स्त्री डॉक्टरांच्याकडून तपासणी व्हावी हा या शिबीराचा मुख्य उद्देश होता.

हुतात्मा किसन अहिर विद्यालय, वाळवा येथे नेत्र, नाक, कान, घसा, हृदय आणि रुग्ण तपासणी करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. स्त्रियांसाठी मिरजेच्या नामवंत स्त्री रोग तज्ञ शिबीरात सहभागी झाल्या होत्या. शिबीरात एकंदर 1 हजार 800 रुग्णांची तपासणी करण्यात आली. डोळ्यांच्या 35 रुग्णांची तपासणी करण्यात आली. विशेषतः स्त्रियांच्या अनेक आजाराबाबत या शिबीरात योग्य मार्गदर्शन व सल्ला देण्यात आला. गरीब रुग्णांच्या औषधोपचाराचा व शस्त्रक्रियेचा खर्च हुतात्मा साखर कारखाना करणार आहे.

**4·14 भविष्यकालीन योजना -**

1) दैनंदिन ऊस गाळप क्षमता - सध्या या कारखान्याची मंजूर व उभारण्यात आलेली दैनंदिन ऊस गाळपक्षमता 1250 मे·टन आहे· भविष्यकाळात ही क्षमता 2500 मे·टनापर्यंत वाढविण्याची कारखान्याची योजना आहे·

2) कारखान्याचे कार्यक्षेत्रातील गावामध्ये स्त्रियांचेसाठी फ्लशिंगचे संडास बांधणेची योजना कारखान्याने जाहीर केली आहे व हे काम लौकरच सुरू होईल·

3) कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील जे क्षेत्र अद्यापही कोरडे आहे ते ओलीताखाली आणण्याच्या दृष्टीने सध्या 6 पाणीपुरवठा योजना आखल्या आहेत त्या आक्टोबरपर्यंत कार्यान्वित होतील· शिवाय गोटखिंडीची वसंत सहकारी पाणीपुरवठा संस्था आणि पडवळवाडीच्या किसान नं· 3 पाणी योजनेला हुतात्मा कारखान्याकडून सक्रिय सहाय्य केले जाईल·